नि.फौ.ख.क्र.४७३/२०२५
शासन–वि– मामुन उर्फ राजा +२
नि.क्र. १२

मी शपथेवर खरे सांगते की,

माझे नांव – पायल गुलाबराव भोगे,
वय अंदाजे ४१ वर्ष, कामधंदा– स्टाफ नर्स,
राहणार– अंबडकर लेआउट, वरुड, तह. व जि. वर्धा.

........................................... ...............................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी– सरकारी वकील श्री.एस.एम.डुंगे यांच्या मार्फत.**

१. दिनांक १०.०२.२०२५ रोजी माझे भावाचे घरी चोरी झाली होती. त्यावेळी भावाच्या घराला कुलूप होते. माझ्या आईने घराला कुलूप लावले होते व ती माझे घरी आली होती. माझा भाउ पराग भोगे याचा दुस–या दिवशी पहाटे फोन आला की त्याचे घरी चोरी झाली आहे. मी त्याचे घरी जावून पाहिले असता कुलूप तुटलेले होते. कपाट उघडे होते आणि रोख रक्कम रुपये ५,०००/– चोरी गेले होते. दोन मोबाईल फोन ज्यातील एक सॅमसंग कंपनीचा होता ते चोरी गेले होते. मी आरोपीविरुध्द फिर्याद दिली होती. फिर्याद व छापील प्रथम खबर मला आता दाखविली. त्यावर माझी सही असून मला त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.१३ व १४** देण्यात आले. चोरी गेलेली रक्कम आणि दोन मोबाईल फोन माझ्या भावाला पोलीस स्टेशन मधून परत मिळाले. चोरी कोणी केली याबाबत मला माहीत नाही.

**उलट तपास – आरोपीने उलट तपास स्वतः नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृती
GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Date: 2025.11.19 16:45:31 +0530
(जी.व्ही.जांगडे–देशपांडे)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
वर्धा, दिनांक १९–११–२०२५

माझे समक्ष
GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE
Date: 2025.11.19 16:45:35 +0530
(जी.व्ही.जांगडे–देशपांडे)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
वर्धा, दिनांक १९–११–२०२५